# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र State | जिल्हा मुंबई District | पोलीस ठाणे ला.प्र.वि. Police Station | पहिली खबर क्र. 19 FIR No. | वर्ष 2026 Year | दिनांक 16/07/2026 Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. कलमे Sections 07
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day बुधवार | तारीख पासून Date from 26/11/25 | वेळ Time 11:30 | तारीख पर्यंत Date to 02/12/25 | वेळ Time 21:30 वा.

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. | तारीख Date 28/11/2025 | वेळ Time 11:00 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 26 | तारीख Date 16/07/2026 | वेळ Time 15:45 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O. P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name कुर्ला नेहरूनगर पोलीस ठाणे | ठिकाणाचे नंबर No. if any ........ | गल्ली Ward कुर्ला मुंबई | रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ | गाव Village ........ | पोस्ट Post ........ | तालुका Taluka ........ | जिल्हा Dist. ........ | राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ | तालुका Taluka ........ | जिल्हा Dist. ........ | राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अशोक गवारी | (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name लक्ष्मण गवारी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 42 वर्षे | (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय | फोन नं. Phone No. 9022480265
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ | दिल्याचा दिनांक Date of issue ........ | दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ | (f) व्यवसाय Occupation नोकरी
   (g) धर्म Religion ........ | जात Caste ........ | जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address - शासकिय पोलीस अधिकारी, वसाहत, वरळी मुंबई - 30 | गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ | घर/नाव नं. House Name No. ........ | फोन/मो. नं. Phone No. ........ | पॅन नं. Pan No. ........ | वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........ | जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ | गाव Village ........ | पोस्ट Post ........ | पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........ | जिल्हा Dist. ........ | राज्य State ........ | सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरेला द सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   लोकसेवक वाघमारे, कुर्ला नेहरूनगर पोलीस ठाणे, मुंबई

यातील फिर्यादी अशोक लक्ष्मण गवारी, रा. ही. शासकिय पोलिस अधिकारी वसतीगृह, वरळी मुंबई -30 यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेली फिर्याद हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(सही)

(मनोज गोडसे)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
वरळी मुंबई.

जबाब दिनांक १६/०७/२०२६

मी, श्री. अशोक लक्ष्मण गवारी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग कार्यालय, वरळी, मुंबई, रा.ठी. शासकीय पोलीस अधिकारी वसतीगृह, पहिला मजला, वरळी मुंबई ४०००३०. मोबाईल क्र. ९०२२४८०२४४.

मी सध्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर एप्रिल २०२५ पासून कार्यरत आहे. दिनांक २८/११/२०२५ रोजी श्री. सुभाष पांडुरंग आहिरे, वय ४४ वर्षे, धंदा चप्पल विक्री व दुरुस्ती, रा. आहिरे फुट वेअर, अमृत नगर पोलीस चौकी समोर, वासुदेव बळवंत फडके रोड, घाटकोपर (पश्चिम), मुंबई हे स्वतः लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई कार्यालयात हजर होऊन त्यांनी स्वतःच्या स्वहस्ताक्षरात लिहिलेला लेखी तक्रार अर्ज मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या नावे दिलेला स्वःहस्तक्षरातील व सही केलेला लेखी तक्रारी अर्ज सादर केला. त्यावर मा. अपर पोलीस आयुक्त, लाप्रवि मुंबई यांनी दि. २८/११/२०२५ रोजी आमची चौकशी अधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. निलेश पाटील व पोलीस पथकास पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत लेखी आदेशित केले.

सदर तक्रार अर्जातील हकिकत अशी की, तक्रारदार सुभाष आहिरे यांनी साधारण एक महिना अगोदर एका रिक्षाचालककाकडून जुना वापरलेला Oppo A16K कंपनीचा पांढ—या रंगाचा मोबाईल फोन विकत घेतला होता. दिनांक २४/११/२०२५ रोजी तक्रारदारास एका अनोळखी मोबाईल क्रमांक ९७०२१०४५४१ वरून तक्रारदार सुभाष आहिरे यांचा मोबाईल क्र. ९००४४२८००० वर कॉल आला असता ते कामात व्यस्त असल्याने फोन उचलला नाही. थोडया वेळानंतर तक्रारदार सुभाष आहिरे यांनी मोबाईल क्रमांक ९७०२१०४५४१ वर परत फोन केला असता समोरील व्यक्तिने स्वतःची ओळख कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाण्यातुन पोलीस वाघमारे बोलत आहे असे सांगितले व तक्रारदार वापरत असलेला मोबाईल चोरीचा असल्याचे सांगून त्यास पोलीस ठाण्यात भेटीस बोलावले. दिनांक २६/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० वा दरम्यान तक्रारदार कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गेले असता, पोलीस वाघमारे यांनी तक्रारदार सुभाष आहिरे यांना पोलीस ठाणेतील कक्षात घेवून गेले तेथे त्यांना बसण्यास सांगून त्यांचे जवळील मोबाईल चोरीचा असल्याचे पुन्हा सांगून, कारवाईची भीती दाखवून, 'तुझ्याविरूध्द मोबाईलचोरीचा गुन्हा दाखल करीन,' असे धमकावुन 'न्यायालयात गेल्यास जामीन व वकिलाचा खर्च मिळून २०,०००/— ( वीस हजार ) रुपये खर्च येईल, त्यापेक्षा मला १०,०००/— ( दहा हजार ) रुपये दिल्यास कोणतीही कारवाई करणार नाही व तुला सोडून देतो.' असे सांगून तक्रारदाराकडे १०,०००/— (दहा हजार) रुपये लाचेची मागणी केली व दिनांक ०४/१२/२०२५ रोजी पर्यंत दहा हजार रूपये रक्कम आणून देण्यास सांगितले. तक्रारदारास सदरची लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २८/११/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात समक्ष येऊन लेखी तक्रार दिली.

आम्ही पर्यवेक्षक अधिकारी पो.नि. निलेश पाटील यांचेसमवेत चर्चा करुन तातडीने पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार प्रभारी पोलीस हवालदार क्र. ९६०२६४—शेमडकर यांना

पंच व पडताळणी पथकाची नियुक्ती करण्यास सांगितले. त्याप्रमाणे काही वेळातच पो.ह. शेमडकर यांनी पडताळणी पथकाची नियुक्ती करुन दोन शासकीय पंच आमचे समक्ष हजर केले. तेव्हा पंचांना त्यांचे नाव व पद विचारले असता पंच श्री. योगेश समाधान उगले, पद– कर सहायक, राज्यकर सहआयुक्त, मुंबई व पंच श्री. मंगेश वैजनाथ वसईकर, पद–कर सहायक, राज्यकर सहआयुक्त, मुंबई अशी दोन्ही शासकीय पंचांची आम्ही ओळख करुन घेतल्यानंतर त्यांची तक्रारदार यांचेशी ओळख करुन देवून दि. २८/११/२०२५ रोजीचा तक्रारदार यांच्या तक्रार अर्जाबाबत पंचाना समजावून सांगून तक्रारदार यांचा तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला व नमुद पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम करण्याची विनंती करण्यात आली. आम्ही केलेल्या विनंतीनुसार दोन्ही पंचानी पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून स्वखुशीने काम करण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर सदर तक्रार अर्जावर पंचाच्या सहया घेण्यात आल्या व समक्ष म्हणुन आम्ही स्वाक्षरी केली तसेच पर्यवेक्षक अधिकारी म्हणून पोनि निलेश पाटील यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. सुभाष आहिरे यांच्या तक्रार अर्जाला पडताळणी क्र. ८२/२०२५ देण्यात आला. तक्रारदार यांनी दिलेल्या अर्जाची पडताळणी कारवाई करावयाची असल्याचे सांगून आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार गोपनिय कक्षात गेलो सदरवेळी गोपनीय कक्षातील पोह. क्र. ०३०२११/ मठपती यांच्या कडून तक्रारदार व दोन्ही पंचांना सोनी कंपनीचे मॉडेल नं. क्र. ICD PX 333 Serial No. 5022197 डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची माहिती देवून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर आम्ही पंचाना दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डमध्ये नवीन सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी. कार्ड नं. 5234DTET518T टाकून आमचे व तक्रारदार, दोन्ही पंच यांचे प्रथम व्यक्तव्य ध्वनिमुद्रित करण्यात आले. तद्नंतर लोकसेवक यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यास आम्ही, पर्यवेक्षक अधिकारी पोनि पाटील, पोलीस पथक, तक्रारदार आहिरे, दोन्ही पंच असे शासकिय वाहनाने ठाणे दैनंदिनी क्र. २१/२५ वेळ १५:४५ वाजता रवाना झालो. त्यानंतर आम्ही कुर्ला पश्चिम डेपो या ठिकाणी जावून थांबलो.

पडताळणी करीता तक्रारदार व त्यांच्या सोबत पंच क्रमांक ०१ श्री. योगेश समाधान उगले यांना लोकसेवक यांच्या कार्यालयात भेटीसाठी पाठविण्याचे ठरले. त्यानुसार टेक्निशियन पोह मठपती यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून, तो तक्रारदार श्री. सुभाष पांडूरंग आहिरे यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला लावून पंचासह रवाना केले. तक्रारदार व पंच लोकसेवक यांचे कार्यालयात जावून शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी कुर्ला (प) डेपो येथे परत आल्यानंतर त्यांचेकडून लोकसेवक यांच्यासोबत झालेल्या संभाषणाबाबत माहिती घेतली तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचा समक्ष ऐकले त्यामध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांना सोबत असलेल्या पंचाबाबत हे कोण? असे विचारले असता तक्रादार यांनी ते त्यांचे घरमालक असल्याचे सांगितले. लोकसेवक पोलीस वाघमारे यांनी तक्रारदार व पंचासमक्ष झालेल्या चर्चेमध्ये त्यांनी तक्रारदार यांच्याकडे पंच क्रमांक ०१ श्री. योगेश समाधान उगले यांच्यासमक्ष लोकसेवक श्री.वाघमारे यांचे सोबत संभाषणामध्ये तक्रारदार यांनी विचारले 'ते मॅमेडीयन नाय का ? त्यांचे काय झाले? अशी विचारणा केली असता लोकसेवक वाघमारे म्हणाले, 'अठरा हजार रुपये देवून गेलेत, तुम्ही देता का ? अठरा दया ? आणि

**सोडतो, हयाच झाल आणि त्यांच झाल, काय संबधच नाही आहे'** असे संभाषण करुन लोकसेवक यांनी तक्रारदार यास मी कॉल करीन तेव्हा या असे सांगितले. पंच क्रमांक ०१ श्री. योगेश उगले यांनी, 'त्यांच मोबाईलचच होत का,? असे लोकसेवक यांना विचारले असता 'त्यांची मोबाईलचीच केस होती' असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक वाघमारे यांनी तक्रारदार यांना सांगितले की, 'मी तुम्हाला फोन करतो, त्यानंतर तुम्ही भेटायला या.' त्याप्रमाणे लोकसेवक यांनी पुन्हा फोन करून भेटण्यास बोलाविले नंतर त्यांचे कार्यालयात भेटण्यास जाण्याचे ठरविण्यात आले. तसा दोन्ही पंचासमक्ष पडताळणी पंचनामा करण्यात आला.

दिनांक ०२/१२/२०२५ रोजी लोकसेवक वाघमारे यांनी तक्रारदार आहिरे यांना फोन करून पुन्हा भेटण्यास बोलावण्यात आले. त्यावेळी मी सुट्टीवर असल्याने, माझ्या जागी म.पो.नि. रजनी उंबरकर यांची पडताळणी क्रमांक ८२/२०२५ मध्ये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तसेच पर्यवेक्षक अधिकारी पोनि निलेश पाटील होते. त्यानंतर लोकसेवक यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यास मपोनि रजनी उंबरकर, पर्यवेक्षक अधिकारी पोनि पाटील, पोलीस पथक, तक्रारदार आहिरे, दोन्ही पंच असे शासकिय वाहनाने दिनांक ०२/१२/२०२५ रोजी ठाणे दैनंदिनी क्रमांक २९/२५ वेळ १५:२५ वाजता रवाना झाले. त्यानंतर ते कुर्ला पश्चिम डेपो या ठिकाणी जावून थांबले. म.पो.नि. उंबरकर व पर्यवेक्षक अधिकारी पोनि पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दोन सरकारी पंचांसमक्ष पुन्हा पडताळणी कारवाई करण्यात आली. यावेळी तक्रारदाराच्या बनियानच्या आतमध्ये सोनी कंपनीचे मॉडेल नं. क्र. ICD PX 333 Serial No. 5022197 डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दोन नवीन सेल टाकले. त्यामध्ये नवीन सॅनडिस्क कंपनीचे मायक्रो एस.डी. कार्ड नं. 5234DTET517L टाकून रेकॉर्डर चालु करुन पंच श्री. योगेश उगले यांच्यासह तक्रारदारास कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाण्यात लोकसेवक वाघमारे यांच्या कार्यालयात पाठविण्यात आले. तक्रारदार व पंच क्र. १ उगले हे लोकसेवक वाघमारे यांच्या कार्यालयात जावून कामासंदर्भात चर्चा करून तक्रारदार व पंच क्र. १ उगले हे शासकिय वाहन उभे असलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी मपोनि उंबरकर यांनी पंच क्र. १ उगले व पंच क्र. २ वसईकर यांच्या समक्ष तक्रारदार यांना लोकसेवक यांचे सोबत काय चर्चा झाली अशी विचारणा केली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण दोन्ही पंचा समक्ष ऐकले असता तक्रारदार यांना लोकसेवक वाघमारे म्हणाले, **'आणला का मोबाईल?'** आता किती आहे? तेव्हा तक्रारदार म्हणाले, **'सहाशे, सातशे आहेत. अर्धा एक तासात देवु का आणुन? अर्ध्या तासात घेवुन येतो.'** तेव्हा लोकसेवक म्हणाले,**'आणि तुमच्याकडे वापरायला फोन भी नसेल ना?'**, तक्रारदार म्हणाले, **'फोन नाय ना..'** लोकसेवक म्हणाले, **' तुमच्या सोबत कसे कॉन्टेक्ट करणार मग....'**.तेव्हा तक्रारदार आहिरे लोकसेवकास **'घेवुन येतो पैसे असे बोलले. किती तीन, तीन हजार ? चालतील ना?** तेव्हा लोकसेवक म्हणाले, **'हा तुम्हाला सांभाळुन घ्यायच आहे, म्हणून काय बोलायचच नाही अस मी ठरवलेल आहे. तुम्हाला मदतच करायची आहे. म्हटल्यावर करावीच लागेल कि मग? लगेच होणार आहे का तुमच तासाभरात.?'** तेव्हा तक्रारदार आहिरे म्हणाले, **'अर्ध्या तासात येतो..** तेव्हा लोकसेवक म्हणाले, **'या घेवुन..'** तेव्हा तक्रारदार आहिरे म्हणाले, **'तीन हजार ना?'** तेव्हा लोकसेवक म्हणाले, **''चालेल''**, **''चालेल'', तुम्हाला मगाशीच फोनवर सांगितलं तयारीने या, मग कसली तयारीने यायला सांगितले**

**तुम्हाला बोलली, तुम्ही या बोललो घेवून,'** तेव्हा तक्रारदार आहिरे म्हणाले, **'येतो मी घेवुन..'** तेव्हा लोकसेवक म्हणाले, **'बाहेरच भेटा... इकडे येवू नका.'** डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक वाघमारे यांनी पंचांसमक्ष लाचेची मागणी केली असल्याचे पडताळणी पंचनामा स्क्रिप्टमध्ये स्पष्टपणे दिसून येते.

त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या टि–शर्टला हात लावुन शरीराची तपासणी केली व विचारले, **'काय आहे खिशात? काय आहे? मी तुमच आपल... म्हणून मी स्पष्ट बोलतोय तुमच्याशी, तुम्ही काय काहीतरी'** त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या कडील मोबाईल फोन काढुन घेतला व स्वत: जवळ ठेवुन घेतला व लोकसेवक यांनी मोबाईलमधील सिमकार्ड काढुन तक्रारदार यांच्याकडे दिले. आणि **'टेन्शन घेवू नका, तुमच काय कळेना झालय? तुमच्या डोक्यात काय चाललय?, निट ऐकुन घ्या जरा, निट ऐकत नाही, नुसत पळायची घाई, जावा तुम्ही मी तुम्हाला नंतर फोन करेल, एकदम व्यवस्थित होईल.'** असे म्हणुन तक्रारदार आहिरे यांना जाण्यास सांगितले.

वरील प्रमाणे तक्रारदार सुभाष पांडुरंग आहिरे यांनी केलेल्या तक्रार अर्जावरून दिनांक २८/११/२०२५ व दिनांक ०२/१२/२०२५ रोजीचे पडताळणी पंचनामे करण्यात आले पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक पोलीस वाघमारे यांनी लाचेची मागणी केलेले संभाषण पंचासमक्ष झालेले असून डिजिटल व्हाईस रेकॉर्डिंग मध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. यावरून कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाण्याचे लोकसेवक पोलीस वाघमारे यांनी तक्रारदारास गुन्हा दाखल करून अटक करण्याची भीती दाखवून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी तक्रारदार श्री. सुभाष पांडुरंग आहिरे यांच्याकडून गैरफायदा मिळण्याच्या अपेक्षेने, अप्रामाणिकपणे कर्तव्य करण्यापासून परावृत्त राहणे करीता १०,०००/– ( दहा हजार ) रूपये लाचेची मागणी केली. तसेच तक्रारदार यांनी १०,०००/– ( दहा हजार ) रूपये रक्कम देण्यास असमर्थता व्यक्त केल्यानंतर लोकसेवक यांनी पुन्हा तडजोडीअंती ३०००/– ( तीन हजार ) रूपये लाचेची मागणी केल्याचे, लाचेची रक्कम ३०००/– रूपये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले म्हणून माझी लोकसेवक पोलीस वाघमारे, कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाणे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित २०१८) चे कलम ७ अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

(signature)

मनोज गोडसे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(signature)
(अशोक ल. गवारी)
पो. नि. ला. प्र. वि. मुंबई

... तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे — पडताळणी वरून दाखल
... for delay in reporting by the complainant/informant

... अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
... of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार श्री. सुभाष पांडुरंग आमरे यांनी पत्नी विश्वास पकडून जुना वापरता ओपो A1 61C कंपनीचा मोबाईल फोन विकत घेतला होता. ज्या लोहमार्ग पोलीस ठाण्यातील आरोपी पोलीस वाघमारे यांनी तक्रारदारास फोन करून मोबाईल चोरीचा असल्याचे चोरीस मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल करीन असे धमकावून गैरफायदा मिळवण्याच्या अपेक्षेने 10000/- रु. लाचेची मागणी करून तडजोडी अंती 3000/- रु. स्वीकारण्याचे मान्य केल्याने लोकसेवक वाघमारे यांचे विरोधात फिर्यादी यांची कायदेशीर तक्रार असल्याने भ्र. प्र. अधि. कलम 7 अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ......

(3) Transferred to P. S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

(अशोक गावडे)
पो.नि. ला.प्र.वि. मुंबई

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name मनोज गोडसे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report